दूरध्वनी : ९१-२२-२२६१४३९१
: ९१-२२-६६५६४०५१
फॅक्स नं. : ९१-२२-२२६१९०१६
ई मेल : tm@mbptmail.com
Telephone : 91-22-22614391
: 91-22-66564051
Fax No. : 91-22-22619016
E-mail : tm@mbptmail.com

# मुंबई पोर्ट ट्रस्ट
# Mumbai Port Trust

यातायात प्रबंधक का कार्यालय,
पत्तन भवन,
शूरजी वल्लभदास मार्ग,
मुंबई – ४०० ००१.
Traffic Manager's Office,
Port House,
Shoorji Vallabhdas Marg,
Mumbai – 400 001.

क.टिएम/एम/१३ - ५/आरटीआय/१९७/१/782

20 MAY 2019.

रजिस्ट्री रसीद डाक / REGD. A.D.

श्री. अशोक यशवंत येवले
102, स्वप्नपूर्ती अपार्टमेंट, शेल कॉलनी,
चेंबूर (पूर्व), मुंबई 400071.

विषय : माहितीचा अधिकार कायदा २००५ च्या अन्वये मागितलेली महिती.
संदर्भ : आपला अर्ज दि. ०२ . ०५ . २०१९ .

---------------

महोदय,

वरील उल्लेखित अर्जाद्वारे आपण श्री. बी.एन. कोळी, श्री. एस.व्ही. शिंदे व उल्हास भसे यांच्या हमालेज इमारतीमधील नेमणूकी संदर्भात माहिती मागितलेली आहे .

२. आपणांस ही माहिती देण्याकरीता आम्ही माहितीचा अधिकार कायदा २००५च्या कलम ५( ४ ) अन्वये वाहतूक विभागाच्या संबधित अनुभागाकडून माहिती मागितली होती.

३. संबधित अनुभागाकडून प्राप्त माहितीनुसार आपणांस खालीलप्रमाणे माहिती / उत्तर देण्यात येत आहे.

आरटीआय कायदा 2005 अंतर्गत माहिती तयार करणे किंवा निष्कर्ष काढून देणे किंवा अर्जदाराच्या समस्यांचे निराकरण करणे किंवा काल्पनिक प्रश्नांची उत्तरे देणे जन माहिती अधिकाऱ्याकडून अपेक्षित नाही.

| क्रमांक | मागितलेली माहिती | पुरवलेली माहिती |
|---|---|---|
| 1) | १) डी-9361- बी.एन. कोळी 2) डी-9721- एस.व्ही. शिंदे 3) डी-9068- उल्हास भसे हे तिन्ही शेड सुपरिटेंडंटची गेली 4-5 वर्षे हमालेज इमारतीमध्येच कशी काय नेमणूक केली जात आहे? | सदर कर्मचाऱ्यांना सलग 4 - 5 वर्ष हमालेज ऑफीसमध्ये पोस्टींग केलेली नाही. त्यांना (दिवसपाळी – दुसरीपाळी, दिवसपाळी – तिसरीपाळी पूल ( Pool ) मध्ये विविध ठिकाणी पोस्टींग दिलेली आहे. ज्यामध्ये शेड व गेट सुद्धा आहेत. |
| 2) | वरील तिन्ही शेड सुपरिटेंडंटना कोणते (नॉर्मस) नियमावली वापरुन फक्त ऑफिस पोस्टिंग दिली जात आहे. त्याबद्दल सविस्तर माहिती देण्यात यावी. | सदर कर्मचाऱ्यांना सलग फक्त ऑफीस पोस्टींग दिलेली नाही. |

| | | |
|---|---|---|
| 3) | वरील शेड सुपरिटेंडंटची हमालेज बिल्डिंगमध्येच नेमणूक करण्यात यावी म्हणून कोणते वैद्यकिय प्रमाणपत्र सादर केले जात आहे. त्याची झेरॉक्स प्रत मिळण्यात यावी. | फक्त श्री. उल्हास भसे यांनी एक वैद्यकिय प्रमाणपत्र सादर केलेले आहे. परंतु वैद्यकिय प्रमाणपत्र हे त्यांच्या वैयक्तिक माहितीशी संबंधित असल्यामुळे आरटीआय कायद्याच्या कलम ८ (१) ( जे ) च्या तरतुदींनुसार सदर प्रमाणपत्राची प्रत देवू शकत नाही. |
| 4) | वरील 3 शेड सुपरिटेंडंटना ऑफिस पोस्टिंग देण्यासाठी कोणत्या वरिष्ठ अधिकार्यांकडून दबाव आला होता? | नाही. |
| 5) | 3 शेड सुपरिटेंडटना पुढिल किती वर्षे हमालेज बिल्डिंगमध्ये नेमणूक देण्यात येणार आहे. त्याबद्दल माहिती द्यावी. | भावी काळातल्या पोस्टींगची माहिती उपलब्ध नाही. |
| 6) | त्यांनाच तिथे का नेमणूक करण्यात आली असी विचारणा केल्यास हे तिन्ही बुकिंग देण्याच्या कामात तरबेज आहेत, असे उत्तर दिले जाते. मग ह्यांच्या निवृत्तीनंतर टाईम किपर ऑफिस बंद करणार आहात का, ह्याबद्दल माहिती देण्यात यावी. | भावी काळाबदलची माहिती उपलब्ध नाही. |
| 7) | रेल्वे उशिरा धावत असल्यास स्टाफ 30 मिनिटे उशिरा आल्यास हे तिन्ही स्टाफला घरी पाठविण्याची धमकी देतात, त्याबद्दल आस्थापनाकडून असा कोणता जी.आर. किंवा टी.आर. आला आहे का, त्याबद्दल माहिती द्यावी. | माहिती उपलब्ध नाही. |
| 8) | वरील तिघांची शेडमध्ये नेमणूक का केली जात नाही, त्याबद्दल माहिती देण्यात यावी. | कृपया क्रमांक (1) मध्ये दिलेली माहिती बघावी. |
| 9) | तसेच जर वरील तीघांप्रमाणे प्रत्येक स्टाफला आपआपल्या मनाप्रमाणे नेमणूक दिल्यास वार्षिक बदली (ट्रान्स्फर लिस्ट) करण्याचा त्रास आस्थापनेला राहणार नाही, ट्रान्स्फर लिस्टचे नाटक कशासाठी. | काल्पनिक प्रश्नांची उत्तरे देणे जन माहिती अधिकाऱ्याकडून अपेक्षित नाही. |

...3/-

५ .   जर आपल्याला वरील मत अमान्य असेल तर आपण श्रीमती एस.जी. पटवर्धन, प्रवर उप सचिव, मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि अपील अधिकारी, दुसरा माळा, पोर्ट भवन, शूरजी वल्लभदास मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई – 400 001 यांचेकडे हे पत्र मिळाल्यापासून 30 दिवसांच्या आत अपील करू शकता. त्यांचा ईमेल आयडी spatwardhan@mbptmail.com आणि संपर्क क्रमांक 022-66564047 आहे. अपीलाची नमूना प्रत 'ड' सोबत जोडत आहे.

संलग्न : वरीलप्रमाणे

आपला विश्वासू

20/5/19

(शा. ह. तिवारी )
उप. यातायात प्रबंधक (सा.) आणि
केंद्रीय जन माहिती अधिकारी (यातायात)
संपर्क क्रमांक : 022-66564053
ईमेलआयडी:shtiwari@mbptmail.com

का.प्र.
20/5/19